MHSO200009722012

दाखल दिनांक – ०२/०७/२०१२
नोंदणी दिनांक – ०२/०७/२०१२
निकाल दिनांक – १६/०३/२०२६
कालावधी – वर्षे महिने दिवस.
१३ ०८ १४

**सांगोला येथील दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, यांचे न्यायालयात**
( पीठासीन अधिकारी – श्रीमती पी. आर. कुलकर्णी )

**नियमीत दिवाणी मुकदमा क्र.२८६/२०१२** **निशाणी क्र. ८७**

१. मौला उर्फ मोहन विठ्ठल होवाळ,
वय : ७० वर्षे, धंदा : शेती,
रा. संगेवाडी, ता. सांगोला, जि. सोलापूर.
२. दिलीप मौला उर्फ मोहन होवाळ, **वादी**
वय : ५० वर्षे, धंदा : नोकरी,
रा. संगेवाडी, ता. सांगोला, जि. सोलापूर.
हल्ली मु. गिलबर्ट, हिलरोड, बाबा पान शॉप अंधेरी,
मुंबई ४०० ०५५८.

**विरुध्द**

१. ज्ञानेश्वर आनंदा वाघमारे,
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती,
रा. संगेवाडी, ता. सांगोला, जि. सोलापूर.
२. सुभाष मौला उर्फ मोहन होवाळ, **प्रतिवादी**
वय : ४१ वर्षे, धंदा : शेती व व्यवसाय,
रा. संगेवाडी, ता. सांगोला, जि. सोलापूर.
हल्ली मु. गिलबर्ट, हिलरोड, बाबा पान शॉप अंधेरी,
मुंबई ४०० ०५५८.

---

**दावा हद्दीखुणा ठरवुन मिळणेबद्दलचा, निरंतर ताकीदीबद्दलचा**

**व वैकल्पीक अतिक्रमण जमिनीचा कब्जा बद्दलचा**

---

श्रीमती एस. टी. खांडेकर – वादीतर्फे विधीज्ञ.

श्री. जी. एन. पाटील – प्रतिवादी क्र.१ तर्फे विधीज्ञ.

श्री. डी. बी. घाडगे – प्रतिवादी क्र.२ तर्फे विधीज्ञ.

---

**न्यायनिर्णय**
(घोषीत दिनांक – १६ मार्च २०२६)

वादीनी प्रस्तुत दावा प्रतिवादी यांचे विरुध्द हद्दीखुणा ठरवुन मिळणेबद्दलचा, निरंतर ताकीदीबद्दलचा व वैकल्पीक अतिक्रमण जमिनीचा कब्जा बद्दलचा दाखल केला आहे.

०२. मिळकतीचे वर्णन – ता. सांगोला, जिल्हा सोलापूर पैकी मौजे संगेवाडी येथील मिळकत –

| **गट क्र.** | **क्षेत्र हे–आर** |
|---|---|
| २७१ | १–८१ |
| पैकी पश्चिम बाजूची | ०–८० |

यासी चतुःसिमा – पुर्वेस – गट क्र. २७१,
पश्चिमेस – गट क्र. २७०,
दक्षिणेस – गट क्र. २६९,
उत्तरेस – गट क्र. २७२, २७४.

येणे प्रमाणे वर्णनाची जमिन, आतील झाड, झुडूप वगैरे तदंगभुत वस्तुसह या दाव्याचा आशय व विषय आहे.

०३. वादीचे दाव्यातील थोडक्यात कथन असे की, दावा कलम १ मधील मिळकत ही मुळची वादीचे खरेदी मालकी हक्क, कब्जेवहिवाटीची आहे. यातील वादी व प्रतिवादी क्र. २ यांचे पुर्व बाजूस प्रतिवादी क्र. १ यांची हे ६० आर जमिन त्याचे मालकी व कब्जेवहिवाटीची आहे. वादी व प्रतिवादी क्र. २ यांचे एकत्र हिंदू कुटूंबाची गट क्र. २७१ मधील १ हे २१ आर, क्षेत्राची मालकी व कब्जेवहिवाट एकत्रीतपणे आहे. सदर दावा मिळकतीस पाणी पुरवठा करणेसाठी ता. ४/८/१९९९ रोजी यातील प्रतिवादी क्र. २

यांनी यातील प्रतिवादी क्र. १ ज्ञानेश्वर आनंदा वाघमारे यांचेकडून रक्कम रू. ३०,०००/- रास बोअर मधील व सबमर्सीबल इले. मोटारमधील ८ आणे हिस्सा रजिस्टर खरेदी खताने खरेदी घेतला आहे. सदर खरेदीखताची नोंद ही ७/१२ पत्रकी प्रतिवादी क्र. २ यांची इतर हक्कामध्ये झालेली आहे व तेव्हापासून सदर बोअर मधून वादी व प्रतिवादी हे पाणी घेत होते व आजही घेत आहेत.

०४. वादीचे पुढील कथन की, यातील वादी क्र. १ व त्याची पत्नी रूक्मीणीबाई म्हणजेच वादी क्र.२ व प्रतिवादी क्र.२ यांचे आई वडिल सदर दावा मिळकत वहिवाटून उत्पन्न व उपभोग घेत आहेत. यातील वादी क्र. २ तसेच प्रतिवादी क्र. २ हा नोकरीनिमीत्त मुंबई येथे राहणेस आहेत. अशी परिस्थीती असताना यातील प्रतिवादी क्र. १ हा यातील वादी यांना दावा मिळकत वहिवाट करणेकामी तसेच समाईक बोअरमधील पाणी घेणे ता. १५/०६/२०१२ रोजी हरकत व अडथळा करू लागले आहेत. तसेच दावा मिळकतीमधील वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान उत्तर दक्षिण चालीचा बांध फोडून पुर्व हददीचे दगड उपटून व बांध फोडणेस व दावा मिळकतीत गैरहक्की अतिकगण करणेस सुरूवात केली आहे. प्रतिवादी क्र. १ हा धाडसी, आडदांड, कुर स्वभावाचा असलेमुळे त्याने उलट अतिक्रमण करून जनावरांचा गोठा घालून गैरकृत्ये चालूच ठेवली आहेत.

०५. वादीचे पुढील कथन की, वरीलप्रमाणे परिस्थिती असताना यातील वादी क्र. १ व २ त्यांचे क्षेत्राप्रमाणे व हद्दीखुणाप्रमाणे त्यांचे दावा कलम १ मधील जमिन नांगरून लेव्हल ता. २२/६/२०१२ रोजी करत असताना यातील प्रतिवादी क्र. १ हा वादीचे जमिनीत संध्याकाळी ५ वाजता अनाधिकाराने व बेकायदेशीरपणे येवून त्यांची नांगरट प्रतिवादी क्र. १ याने बंद पाडली व जमिनीचे हद्दीखुणाबद्दल व वहिवाटीबद्दल भांडु लागला. त्यामुळे वादीनी त्यास सर्वांचे जमिनी मोजुन आपण हद्दीखुणा कायम करून घेवु असे प्रतिष्ठीत लोकांमार्फत बजावले असता प्रतिवादी क्र. १ हा ऐकणेस तयार नाही. याउलट त्याने वादींचे जमिनीत पुर्व भागात अतिक्रमण करणार अशी धमकी दिली व वादींना वहिवाटीस बेकायदेशीरपणे हरकत व अडथळे केले. त्यामुळे वादीचे न भरून येणारे नुकसान होणार आहे व होत आहे. त्यामुळे वादींना प्रतिवादी विरूध्द मा. कोर्ट

कमिशनर मार्फत मोजणी होवून वाद मिळकतीचे हद्दीखुणा कायम होवून मिळणेचा दावा व निरंतर ताकीदीचा दावा करणे भाग पडले आहे. वादींचे असे कथन आहे की, सोबत दावा मिळकतीचा कच्चा हात नकाशा दिलेला आहे तो या दाव्याचा एक भाग समजणेत यावा.

०६. सबब वादींनी अशी विनंती केली की, दाव्यात नमूद केलेल्या कारणास्तव दावा कलम १ मधील दावा मिळकतीची मोजणी होवुन हद्दीखुणा कायम होवून मिळाव्यात. मा. कोर्टकमिशनर म्हणून तालुका निरीक्षक भूमि अभिलेख सांगोला अगर त्यांचे सक्षम कॅडेस्ट्रीयल सर्वेअरची नेमणूक होवून दावा कलम १ मधील मिळकतीचे क्रमाक्रमाने मोजून हद्दीखुणा कायम होणेकामी नेमणुक करावी. यातील प्रतिवादी क्र. १ यांनी वादी यांचे जमिनीत अतिक्रमण करू नये व बोअरवेल मधील पाणी घेणेस हकरत अडथळा होतील असे कोणतेही बेकायदेशीर कृत्य करू नये अशी निरंतरची ताकीद प्रतिवादी क्र. १ यांना देणेत यावी. वादींची वैकल्पीक मागणी अशी की, यदाकदाचित दावा कलम १ मधील मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ यांनी मोजणीअंती अतिक्रमण केलेचे निष्पन्न झाल्यास अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा प्रतिवादीकडून वादीस मिळावा. सबब वादीचा दावा खर्चासह मंजूर करण्यात यावा अशी मागणी वादीने केली आहे.

०७. प्रतिवादी क्र.१ यांनी निशाणी १८ वर त्यांची कैफियत व म्हणणे मांडून वादींच्या दाव्यातील सर्व विरोधी कथने नाकारली आहेत. सदर प्रतिवादीचे म्हणणे असे की, प्रतिवादी क्र.१ हा पुर्वीपासुन त्याची दावा मिळकतीत जशी वहीवाट आहे त्याप्रमाणे आजतागायत वहीवाट करत आहे. वादी म्हणतात त्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ ने वादीचे जमिनीत कधीही अतिक्रमण केलेले नाही. वादी म्हणतात तेवढ्या क्षेत्राचे वादी मालक वहिवाटदार नाहीत. वादी व त्याचे वडील, प्रतिवादी व त्याचे वडील हे नातेवाईक असलेचा गैरफायदा घेवुन खोटेनाटे कागदपत्र तयार करुन वादी प्रतिवादीची प्रत्यक्ष मालकी वहिवाटीची जमिन गिळंकृत करु पाहत आहेत. प्रतिवादींनी वादींना गट नं. २७१ मधील बोअरमध्ये कधीही हिस्सा खरेदी दिलेला नव्हता अगर त्याप्रमाणे वादीनी सदर बोअरने पाणी कधीही घेतलेले नाही. तसा कसलाही मोबदला प्रतिवादी क्र.१ यास मिळालेला नाही. केवळ त्याने खरेदी घेतलेल्या मिळकतीत स्वखर्चाने विहीर पाडतो व

त्यात प्रतिवादी क्र.१ यासही निम्मा हिस्सा देतो असे सांगुन प्रत्यक्षात विहीर न पाडता व प्रतिवादी क्र.१ यास कसलाही मोबदला न देता तथाकथित बोगस, बिनभरणाचा खरेदीखत म्हणविणारा दस्त वादीनी अस्तित्वात आणुन प्रतिवादी क्र.१ चे बोअरमध्ये हिस्सा घालणेचा प्रयत्न वादीनी चालु केला आहे. वादीनी बरेच ख–या गोष्टींची माहिती मे. कोर्टापासुन लपवुन ठेवुन तुर्तातुर्त ताकीदीची मागणी केलेली आहे. वादी व प्रतिवादी क्र.२ यांनी या मे.कोर्टात रे.दि.मु.नं.२१८/२००६ चा दावा डिक्लेरेशन व इंजेक्शनसाठी तसेच शेतजमिनीवरील अतिक्रमण काढणेसाठी दाखल केलेला होता. त्या दाव्यात प्रतिवादी क्र.१ याने स्वतः हजर होवुन कैफियत दिलेली होती. सदरचा दावा दि.०३/०९/११ रोजी मे. कोर्टानी वादीने मे. कोर्टात हजर राहुन पुरावा दिला नाही म्हणुन काढुन टाकलेला आहे. त्यामुळे वादी यांना प्रस्तुतचा दावा या प्रतिवादी क्र.१ विरुध्द सी.पी.सी. कोड कलम ११ प्रमाणे सदरचा दावा दाखल करुन प्रतिवादी क्र.१ विरुध्द कसलीही दाद मागणेचा अधिकार राहिलेला नाही. वादीनी मुद्दाम सदर दावेतील वादीस या दाव्यात प्रतिवादी जाणुनबूजून केलेले आहे.

०८. प्रतिवादीचे पुढील म्हणणे असे की, दावा जमिनीचा वादींचा वादीने नमुद केलेल्या क्षेत्राइतका मुळीच हक्क नाही. वादीनी त्याचे मर्जीप्रमाणे तथाकथित व बोगस अशी दिशा दाखवुन प्रतिवादी क्र.१ ची संमती न घेता खरेदीखते केलेली आहेत. दावा जमिन ही मुळ वामन व आनंदा रामा वाघमारे या दोन्ही भावाचे वडीलार्जीत मालकीची होती. त्यादोघांचे दावा जमिनीचे कधीही सरस निरस मानाने वाटप झालेले नव्हते. प्रतिवादी क्र.१ हा मयत आनंदाचा मुलगा असुन त्यास दावा जमिनीतील हिस्सा वाटपाने आलेला आहे. प्रतिवादी क्र.२ व वादी क्र.१ यांनी मयत वामन यांचे हिश्याची अविभक्त जमिन खरेदी घेतलेली आहे. वादी क्र.१, २ व प्रतिवादी क्र.२ हे दावेत नमुद केलेप्रमाणे क्षेत्राचे मुळीच मालक नाहीत. दावा जमिनीचे वादी प्रतिवादीमध्ये सरस निरस मानाने वाटप झालेले नव्हते व नाही. वादीनी दाव्यात दिलेला नकाशा हा चुकीचा असुन तो प्रतिवादी क्र.१ यास मुळीच मान्य व कबुल नाही. वादी, प्रतिवादी यांचेमध्ये सरस निरस मानाने वाटप झालेशिवाय कॅडेस्ट्रीअल सर्वेअर यांची मोजणीकामी मुळीच नेमणूक करता येणार नाही.

०९. प्रतिवादीचे पुढील असे म्हणणे आहे की, सदर दाव्यात बॅलन्स ऑफ कनव्हीनिअंस हा प्रतिवादी क्र.१ चे बाजुने असुन वादींना मुळीच प्रायमाफेसी केस नाही. सबब, वादीचा दावा खर्चासह रद्द करणेची विनंती प्रतिवादी क्र.१ याने केली आहे.

१०. प्रतिवादी क्र.२ यांनी निशाणी २५ वर त्यांची कैफियत व म्हणणे मांडून वादींच्या दाव्यातील सर्व कथने मान्य केली आहेत. प्रतिवादी क्र.२ यांनी दि.४/८/१९९९ रोजी प्रतिवादी क्र.१ ज्ञानेश्वर आनंदा वाघमारे यांचेकडून रक्कम रू.३०,०००/– बोअरमधील व सबमर्सिबल ८आणे हिस्सा रजिस्टर खरेदीखताने खरेदी घेतला असल्याचे कथन केला आहे. वादी व प्रतिवादी क्र.२ यांचे एकत्र हिंदु कूटूंब आहे असे कथन प्रतिवादी क्र.२ यांनी केले आहे. दावा मिळकतीची प्रत्यक्ष मोजणी होवून हद्दीखुणा कायम होवून इतर योग्य ते न्यायाचे हुकूम व्हावेत अशी विनंती प्रतिवादी क्र.२ यांनी केली आहे.

११. वादीतर्फे विधीज्ञ श्रीमती एस. टी. खांडेकर व प्रतिवादी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री. जी. एन. पाटील, प्रतिवादी क्र.२ तर्फे विधीज्ञ श्री. डी. बी. घाडगे यांचा युक्तिवाद ऐकला. माझे पूर्व अधिकारी यांनी दाव्यातील कथनांवरून खालील मुद्दे निशाणी ४० उपस्थित केले आहे ते मुद्दे निष्कर्षासह खालील प्रमाणे आहेत.

| <u>Sr. No.</u> | <u>ISSUES</u> | <u>FINDINGS</u> |
|---|---|---|
| 1. | Do plaintiffs prove that, suit land is joint Hindu family property of them and defendant no.2?<br>दावा मिळकत वादी व प्रतिवादी क्र.२ यांची हिंदु एकत्र कुटूंबाची मिळकत असल्याचे वादी सिध्द करतात का ? | In the Negative<br>नकारार्थी |
| 2. | Do plaintiffs prove that, defendants are started trying to encroach upon the suit land ?<br>प्रतिवादींनी दावा मिळकतीवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केल्याचे वादी सिध्द करतात का ? | In the Negative<br>नकारार्थी |
| 3. | Do plaintiffs prove that, defendants have obstructed their peaceful possession over the suit land ?<br>प्रतिवादींनी वादींच्या दावा मिळकतीच्या शांततामय ताब्यास हरकत अडथळा केल्याचे वादी सिध्द करतात का ? | In the Negative<br>नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| 4. | Are plaintiffs entitled for permanent injunction as prayed ?<br>वादी मागणी करत असल्याप्रमाणे कायमस्वरुपी ताकीदीस पात्र आहे का ? | In the Negative<br>नकारार्थी |
| 5. | Are plaintiffs entitled to get fix boundaries of suit land by appointing TILR Sangola ?<br>वादी तालुका उपनिरीक्षक भुमि अभिलेख यांच्या मार्फत दावा मिळकतीच्या हद्दीखुणा कायम करुन मिळण्याच्या अनुतोषास पात्र आहेत का ? | In the Negative<br>नकारार्थी |
| 6. | Are plaintiffs entitled for consequential relief to recover possession of encroached land ?<br>वादी अतिक्रमीत जागेचा अनुषंगिक ताबा मिळण्याच्या अनुतोषास पात्र आहेत का ? | In the Negative<br>नकारार्थी |
| 7. | What order and decree ?<br>काय आदेश व हुकूमनामा ? | Suit is dismissed.<br>दावा नामंजूर. |

## कारणमिमांसा

१२. वादींनी त्यांच्या कथनांच्या पृष्ठयर्थ मौला उर्फ मोहन विठ्ठल होवाळ (वा.सा.क्र.१) यांची साक्ष निशाणी क्र.४४ वर नोंदवली आहे. वादींनी आतिष तुकाराम वाघमारे (वा.सा.क्र.२) याचे सरतपासाचे शपथपत्र निशाणी क्र.५८ वर दाखल केले आहे. वादींनी रामदास दुर्योधन पवार (वा.सा.क्र.३) याचे सरतपासाचे शपथपत्र निशाणी क्र.६० वर दाखल केले आहे. वादींनी कुलदिप रामचंद्र वाघमारे (वा.सा.क्र.४) याची साक्ष निशाणी क्र.६१ वर नोंदवली आहे. निशाणी क्र.६३ वर पुरसीस देवून वादींनी त्यांच्या पुरावा बंद केला आहे. वादींनी खालील कागदपत्रे पुराव्यात दाखल केली आहेत.

| अ.क्र. | तपशिल | निशाणी |
|---|---|---|
| १. | मौजे संगेवाडी येथील जमिन गट क्र. २७१ चा ७/१२ उतारा | ८२ |
| २. | मौजे संगेवाडी येथील जमिन गट क्र. १९० व १९१ चा ६ड चा उतारा | ५५ |
| ३. | मौजे संगेवाडी येथील फेरफार क्र.११९ चा ६ड चा उतारा | ५६ |
| ४. | मौजे संगेवाडी येथील जमिन गट क्र. २७१ चा सन १९८१-१९८२ चा उतारा | ६९ |

| | | |
|---|---|---|
| ५. | मौजे संगेवाडी येथील जमिन गट क्र. २७१ चा सन १९९२–१९९३ चा ७/१२ उतारा | ७० |
| ६. | मौजे संगेवाडी येथील जमिन गट क्र. २७१ चा सन १९९९–२००० चा ७/१२ उतारा | ७१ |
| ७. | मौजे संगेवाडी येथील जमिन गट क्र. २७१ चा सन २००६–२००७ चा ७/१२ उतारा | ७२ |
| ८. | ज्ञानेश्वर आक्र.दा वाघमारे यांचेकडून सुभाष मोहन होवाळ याने दि.०४/०८/१९९९ रोजी र.रु. ३०,०००/– स खरेदी घेतलेल्या बोअरचे खरेदी खताची नक्कल | ७७ |

१३. प्रतिवादी क्र.१ यांनी स्वतःची (प्र.सा.क्र.१) साक्ष निशाणी क्र.६४ वर नोंदवली आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी त्यांची साक्ष (प्र.सा.क्र.२) यांची साक्ष निशाणी क्र.७५ वर नोंदवली आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी निशाणी क्र.७३ वर पुरसीस देवुन पुरावा बंद केला आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी निशाणी क्र.७८ वर पुरसीस देवुन पुरावा बंद केला आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी खालील कागदपत्रे दाखल केली आहेत.

| अ.क्र. | तपशिल | निशाणी |
|---|---|---|
| १. | वादी क्र.२ यांनी सांगोला येथील मे. सि.ज. ज्यु.डी. यांचे कोर्टात रे.मु.क्र.१०९/२०२३ चा दावा | ८१ |
| २. | रे.मु.क्र.२१७/२००६ मधील नि.क्र.१ ची सही शिक्याची नक्कल | ८५ |
| ३. | रे.मु.क्र.२१७/२००६ मधील वादीची कैफियत | ८६ |

**मुद्दा क्रमांक १ ते ६ बाबत –**

१४. वरील मुद्यांच्या अनुषंगाने विवेचन एकाच पुराव्यावर आधारीत असलेमुळे कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचे गुणग्रहण एकत्रितरित्या केले आहे. वादी व प्रतिवादी यांच्यातील परस्पर विरोधी तत्थ्ये पाहण्यापूर्वी उभय पक्षांना मान्य असणा–या बाबी पाहणे आवश्यक आहे. वादी क्र.१ हे वादी क्र.२ व प्रतिवादी क्र.२ यांचे वडील

आहेत ही बाब वादातीत नाही. वादी व प्रतिवादी यांचे क्षेत्र मौजे संगेवाडी येथे गट क्र.२७१ मध्ये आहे ही बाब वादातीत नाही.

१५. वादीचे असे कथन आहे की, मौजे संगेवाडी येथील गट नं. २७१ मधील १हे–२१आर जमिन वादी, प्रतिवादी क्र.२ यांची हिंदु एकत्र कुटूंबाची मालमत्ता आहे. गट क्र. २७१ पैकी पश्चिम बाजूची ८० आर जमीन म्हणजेच दावा मिळकत वादीची खरेदी मालकी हक्काची वहिवाटीची आहे. वादी व प्रतिवादी क्र.२ यांच्या पूर्व बाजूस प्रतिवादी क्र.१ याची ६०आर जमिन आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.१ कडुन दि.०४/०८/१९९९ च्या खरेदी खताने बोअरवेलमधील ८ आणे हिस्सा प्रतिवादी क्र.१ कडून खरेदी घेतला आहे. प्रतिवादी क्र.१ वादीला सदर बोअरवेल मधून पाणी घेण्यास हरकत अडथळा करत आहे.

१६. उलटपक्षी प्रतिवादी क्र.१ चे असे कथन आहे की, वादींनी यापूर्वीही प्रतिवादी क्र.१ विरुध्द रे.मु.नं.२१७/२००६ दाखल केला होता. दि.०४/०८/१९९९ रोजीचे खरेदीखत प्रतिवादी क्र.१ याची दिशाभुल करुन अंमलात आणले आहे. दावा जमिन मुळतः वामन व आनंदा रामा वाघमारे यांच्या मालकीची होती. सदर जमिनीचे वाटप झाले नव्हते. प्रतिवादी क्र.१ हा आनंदचा मुलगा आहे. त्यामुळे त्यास वाटपात दावा जमिनीत हिस्सा आला आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी वामनच्या हिश्याची जमिन खरेदी केली आहे. मुळतः आनंद व वामन यांच्यामध्ये वाटप झालेले नाही. जमिन सामाईक असल्यामुळे वाटप न करता हद्दीखुणा कायम करता येणार नाही. वादी कथन करीत असलेल्या क्षेत्राचे ते मालक नाहीत. सबब, परस्पर विरोधी कथनांच्या अनुषंगाने अभिलेखावरील पुरावा विचारात घेणे आवश्यक आहे.

१७. वादींचे प्रामुख्याने असे कथन आहे की, गट क्र.२७१ मधील ८० आर पश्चिम बाजूची जमिन वादग्रस्त आहे. सदर मिळकतीवर प्रतिवादी अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करत आहे. प्रतिवादी क्र.२ याने प्रतिवादी क्र.१ याच्या बोअरमधून विकत घेतलेला हिस्सा वापरण्यास प्रतिवादी क्र.१ हरकत अडथळा करत आहे. सदरच्या बाबी सिध्द करण्याचे उत्तरदायीत्व वादींवर आहे. वादींनी वादी क्र.१ मौला उर्फ मोहन विठ्ठल

होवाळ यांची साक्ष नि.क्र.४४ वर नोंदवली आहे. वादी क्र.१ यांनी सरतपासाचे शपथपत्र दाखल करुन वादपत्रातील कथनांचा पुनरुच्चार केला आहे. उलटतपासादरम्यान वादग्रस्त मिळकत ज्ञानेश्वर यांच्या वडीलांकडून व चुलत्याकडून खरेदी केल्याचे सदर साक्षीदाराने मान्य केले आहे. वादग्रस्त मिळकत आनंदा वाघमारे व वामन वाघमारे यांच्याकडून खरेदी घेतल्याचे सदर साक्षीदाराने कथन केले आहे. सदर साक्षीदाराने खरेदीवेळी आनंदा व वामन यांच्यामध्ये वाटप झाले नसल्याचे मान्य केले आहे. तसेच खरेदीपासुन अद्यापपर्यंत सदर जमिनीचे सरस निरस मानाने वाटप झाले नसल्याचे सदर साक्षीदाराने मान्य केले आहे. वाटपाचा दावा केला नसल्याचा सदर साक्षीदाराने मान्य केले आहे. पुराव्याचे शपथपत्रात नमुद बोअर, भुनलिका सध्या अस्तित्वात नसल्याचे सदर साक्षीदाराने मान्य केले आहे.

१८. वादींनी आतिष तुकाराम वाघमारे (वा.सा.क्र.२) तसेच रामदास दुर्योधन पवार (वा.सा.क्र.३) यांच्या सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. परंतु सदरची शपथपत्रे नंतर नॉट प्रेस केली. वादीमार्फत सदर साक्षीदाराची साक्ष नोंदवण्यात आली नाही. वादींनी कुलदिप रामचंद्र वाघमारे (वा.सा.क्र.४) यांची साक्ष नि.क्र.६१ वर नोंदवली आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये वादी हे त्याच्या बहिणीचे सासरे असून वादीच्या घरी व दावा मिळकतीमध्ये त्याची ये–जा असते असे कथन केले आहे. तसेच वादीच्या मुळ कथनाशी सुसंगत असे कथन केले आहे. उलटतपासादरम्यान सदर साक्षीदाराने वामन व आनंदा हे सख्खे भाऊ होते ही बाब मान्य केले आहे. वामनच्या हिश्याची जमिन वादी यांनी विकत घेतली ही बाब सदर साक्षीदाराने मान्य केली आहे. दि.०४/०८/१९९९ चे बोअरवेल मधील खरेदीखत त्याच्या समक्ष झाले नसल्याचे सदर साक्षीदाराने मान्य केले आहे. इतर सर्व विरोधी सुचना सदर साक्षीदाराने नाकारले आहे.

१९. प्रतिवादी क्र.१ ज्ञानेश्वर आनंदा वाघमारे यांनी वादीच्या दाव्याचे खंडण करण्यासाठी नि.क्र.६४ वर ज्ञानेश्वर आनंदा वाघमारे म्हणजे स्वतःची साक्ष नोंदवली आहे. त्यांनी सरतपासाचे शपथपत्र दाखल करुन त्यांच्या कैफियतीतील कथनाशी सुसंगत असे कथन सरतपासाच्या शपथपत्रामध्ये केले आहे. उलट तपसादरम्यान

वादग्रस्त मिळकत आनंदराव वाघमारे यांची वडीलोपार्जीत मिळकत होती ही बाब सदर साक्षीदाराने मान्य केली आहे. सदर जमिन पूर्वी पांडू वाघमारे यांची होती, ते १९७३ साली मयत झाले ही बाब सदर साक्षीदाराने मान्य केली आहे. पांडु वाघमारे यांना कोणतेही अपत्य नसल्याने आनंदा व वामन यांच्या नावाची नोंद वारसाहक्काने झाली ही बाब सदर साक्षीदाराने मान्य केली आहे. दि.२८/११/१९७७ रोजी ९१आर जमिन खरेदी केली होती परंतु दिशा निश्चीत केल्या नव्हत्या ही बाब सदर साक्षीदाराने मान्य केली आहे. त्याचदिवशी ३०आर मधली जमिन आनंदा वाघमारे यांनी मौला होवाळ यांनी विक्री केल्याचे सदर साक्षीदाराने मान्य केले आहे. आनंदची जमिन शिल्लक असल्याचे सदर साक्षीदाराने मान्य केले आहे. ७/१२ पत्रकी मौला होवाळ यांच्या नावाची नोंद झाली असल्याचे सदर साक्षीदाराने मान्य केले आहे. प्रतिवादी क्र.१ जी जमिन वहीवाटतो ती जमिन वादीच्या जमिनीच्या पूर्व बाजूस असल्याचे सदर साक्षीदाराने मान्य केले आहे. सदर जमिनीच्या दक्षिणेला त्याचे घर व उत्तरेला जमिन असल्याचे सदर साक्षीदाराने मान्य केले आहे. सन १९९२–९३ ला वादी व त्याच्या वडीलांच्या नावाची नोंद महसूल दप्तरी होती ही बाब सदर साक्षीदाराने मान्य केली आहे. त्याला दोन भाऊ आहेत. तसेच दोन बहिणी आहेत व वडीलांच्या मृत्यूनंतर भावा–बहिणींची नावे वारसाहक्काने लागल्याचे सदर साक्षीदाराने मान्य केले आहे. बोअरच्या फेरफाराबाबत तक्रार देवून ही फेरफार नोंदवला असल्याचे सदर साक्षीदाराने मान्य केले आहे. वादीविरुध्द तक्रार केली नसल्याचे सदर साक्षीदाराने कथन केले आहे.

२०. प्रतिवादी क्र.२ सुभाष मौला उर्फ मोहन होवाळ यांनी नि.क्र.७५ वर सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी वादींच्या कथनाशी पुरक अशी साक्ष सरतपासाच्या शपथपत्राव्दारे दिली आहे. प्रतिवादी क्र.१ तर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये वामन व आनंदा यांचा दावा मिळकतीमध्ये प्रत्येकी अर्धा हिस्सा होता, प्रतिवादी ज्ञानेश्वर हा आनंदाचा मुलगा आहे. ज्ञानेश्वरला मिळकतीमध्ये ८आणे हिस्सा वारसाने मिळाला आहे याबाबी मान्य केल्या आहेत. तसेच वामनच्या ८आणे हिश्याला त्याचे वडील खरेदीखताने मालक झाले याबाबी सदर साक्षीदाराने मान्य केल्या आहेत. इतर सर्व विरोधी सुचना सदर साक्षीदारने नाकारले आहेत.

२१. अभिलेखावरील एकंदरीत पुराव्यावरून असे दिसून येते की, गट क्र. २७१ मधील १ हे. ८१ आर इतकी जमीन पांडू जानू वाघमारे यांच्या मालकीची होती. त्यांचा दि.१२/०५/१९७३ रोजी मृत्यू झाला. त्यांचे वारस पुतणे म्हणून आनंदा रामा वाघमारे व वामन रामा वाघमारे यांच्या नावाची नोंद महसूल दप्तरी इतर मिळकतीचे बरोबर गट क्र.२७१ च्या अनुषंगाने झाली. त्यानंतर प्रस्तुत वादी क्र १ मौला उर्फ मोहन होवाळ यांनी गट क्र. २७१ पैकी पश्चिमेची ९१ आर जमीन वामन रामा वाघमारे यांच्याकडून खरेदी घेतली. गट क्र. २७१ पैकी मधली ३० आर जमीन आनंदा रामा वाघमारे यांच्याकडून मौला उर्फ मोहन होवाळ यांनी खरेदी घेतली. तसेच आनंदा वाघमारे यांची गट क्र.२७१ मधील जमीन प्रतिवादी क्र. १ ज्ञानेश्वर वाघमारे याला वारसाने मिळाली.

२२. वादीतर्फे नि.क्र.५५ वर फेरफार क्र.१९० व १९१ दाखल करण्यात आला. त्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वामन वाघमारे यांनी प्रस्तुत वादी क्र.१ मौला विठ्ठल होवाळ यांना गट क्र.२७१ पैकी पश्चिमेची ९१ आर जमिन खरेदी दिली. फेरफार क्र.१९१ चे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, आनंदा वाघमारे यांनी मौला होवाळ यांना गट क्र.२७१ मध्ये मधली ३० आर जमिन खरेदी दिली. वादीनी नि.क्र.५६ वर फेरफार क्र.११९ ची प्रत दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, आनंदा रामा वाघमारे, वामन रामा वाघमारे यांच्या नावाची नोंद पांडा जानू वाघमारे यांच्या मृत्यू नंतर गट क्र.२७१ च्या अनुषंगाने झाली आहे.

२३. वादीचे एकंदरीत असे कथन आहे की, गट नंबर २७१ मधील १हे–२१आर जमिन वादी व प्रतिवादी क्र.२ यांच्या एकत्र कुटूंबाची मिळकत आहे. वादीनी वादपत्रामध्ये केवळ गट क्र. २७१ मधील ८० आर जमीन म्हणजेच दावा मिळकत खरेदीची मालकीची असल्याचे कथन केले आहे. वादीतर्फे गट क्र २७१ चा ७/१२ उतारा नि.क्र .६९ वर दाखल केला आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की पांडू जानू वाघमारे यांच्या मृत्यू नंतर गट क्र. २७१ मधील क्षेत्र १ हे ८१ आर क्षेत्राला आनंदा रामा वाघमारे व वामन रामा वाघमारे यांच्या नावाची नोंद झाली होती.

वामन रामा वाघमारे यांनी जमीन विक्री केल्यानंतर त्यांच्या नावाच्या ठिकाणी वादी मौला उर्फ मोहन होवाळ यांच्या नावाची नोंद झाली आहे. गट क्र २७१ च्या नि.क्र ७० वरील ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की आनंदा वाघमारे व वादी क्र १ मौला उर्फ मोहन होवाळ यांच्या नावाची नोंद १हे ८१ आर क्षेत्राला झाली आहे. नि क्र. ७१ वरील गट क्र २७१च्या ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की आनंदा वाघमारे, मधुकर वाघमारे, लिंबाजी वाघमारे, लक्ष्मी वाघमारे यांची नावे कमी होवून आनंदा वाघमारे व मौला होवाळ यांच्या नावाची नोंद कायम ठेवली आहे. वादीतर्फे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये वाटप झाल्याचे सदर ७/१२ उताऱ्यावरून दिसून येते. ही बाब नमूद करणे आवश्यक आहे की, वाटपाबाबत वादीचे वादपत्रामध्ये कथन नाही. त्यामुळे वादीच्या युक्तीवादामध्ये तथ्य नाही. नि.क्र . ७२ व नि.क्र ८२ वरील ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता मौला होवाळ यांच्या नावाची नोंद ३९ आर क्षेत्राला, ज्ञानेश्वर वाघमारे यांच्या नावाची नोंद ५ आणे ४ पै क्षेत्राला, सुभाष होवाळ यांच्या नावाची नोंद ४१ आर क्षेत्राला व दिलीप होवाळ यांच्या नावाची नोंद ३५ आर क्षेत्राला झाली आहे.

२४. वादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की सदर ७/१२ उताऱ्यानुसार क्षेत्र निश्चिती झाल्याचे दिसून येते. ही बाब नमूद करणे आवश्यक आहे की, सदर ७/१२ उताऱ्यानुसार चतुःसीमापूर्वक क्षेत्र निश्चिती झालेली नाही. नि क्र. ५५ वरील फेरफार क्र. १९० नुसार वादी व प्रतिवादी क्र. २ यांनी पूर्व हक्कदार वामन वाघमारे यांच्याकडून ९१ आर पश्चिमेकडील जमीन खरेदी घेतली व फेरफार क्र. १९१ नुसार प्रतिवादी क्र.१ यांचे पूर्व हक्कदार आनंदा वाघमारे यांच्याकडून ३० आर जमीन मौला होवाळ यांनी मधली खरेदी घेतली. परंतू आनंदा वाघमारे यांच्या गट क्र२७१ मधील उर्वरित जमीनीबाबत, क्षेत्राबाबत व स्थितीजन्य परिस्थिती बाबत कोणतेच कथन वादपत्रात नाही. मूळतः वादपत्रामध्ये पूर्वहक्कदारांबाबत, खरेदी व्यवहाराबाबत, स्थितीजन्य परिस्थितीबाबात सुस्पष्ट कथन केले नाही. वादींनी वादपत्रासोबत हस्तनकाशा दाखल केला आहे. परंतू सदर हस्तनकाशातील क्षेत्र वादी व प्रतिवादींना कसे प्राप्त झाले याबाबत वादपत्रात कथन केलेले नाही.

२५. प्रतिवादींनी नि.क्र.८५ वर रे.मु.नं.२१७/२००६ याची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.१ विरुध्द गट क्र.२७१ मधील बोअरवेल बाबत दावा दाखल केला होता. सदरचा दावा सुभाष होवाळ यांनी न चालवल्यामुळे खारिज करण्यात आला. सदर दाव्यामध्ये प्रस्तुत प्रतिवादी क्र.१ यांनी दाखल केलेल्या कैफियतीची प्रमाणित प्रत नि.क्र.८६ वर प्रतिवादींना हजर केली आहे. प्रस्तुत दाव्यातील कथनाशी सुसंगत असे कथन प्रतिवादी क्र.१ यांनी सदर दाव्यामध्ये केले आहे.

२६. प्रतिवादी क्र.१ यांनी रे.मु.नं.१०९/२०२३ यातील वादपत्राची प्रमाणित प्रत नि.क्र.८१ वर हजर केली आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदरचा दावा प्रस्तुत वादी क्र.२ व सिध्दांत होवाळ यांनी प्रस्तुत वादी क्र.१, प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या विरुध्द दाखल केला होता. सदर दाव्यामध्ये प्रस्तुत वादी क्र.२ यांनी असे कथन केले आहे की, गट क्र.२७१ मधील १हे–८१आर जमिन सदर दाव्यातील दावा मिळकत असून आनंदा व वामन यांच्यामध्ये सदर मिळकतीचे वाटप झालेले नव्हते. परंतु प्रस्तुत दाव्यात वादीतर्फे प्रतिवादी क्र.१ यांचा उलटतपासादरम्यान आनंदा व वामन यांच्यामध्ये मिळकतीचे वाटप झाले होते व आनंदा यास पूर्वेकडील जमिन वाटपाने आली तसेच वामन यास पश्चिमेकडून ९१आर जमिन वाटपाने आली असे सुचवण्यात आले. सबब वादींनी प्रस्तुत दाव्यात व रे.मु.नं.१०९/२०२३ मध्ये विभीन्न कथने केल्याचे दिसुन येते. तसेच मौला उर्फ मोहन होवाळ (वा.सा.क्र.१) यांच्या उलटतपासामध्ये आनंदा व वामन यांच्यामध्ये वाटप झाले नसल्याचे मान्य केले आहे. सबब, वादीचा पुरावा विसंगत असल्याचे दिसून येते.

२७. वादी व प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार वामन व आनंदा यांच्यामध्ये वाटप झाले होते किंवा नाही याबाबत वादीचे वादपत्रात स्पष्ट कथन नाही. वादींनी ज्या खरेदी आधारे दावा मिळकतच्या मालकीची मागणी केली आहे ती खरेदीखते, खरेदीव्यवहार याबाबत कोणताही पुरावा दिलेला नाही. सबब वादी दावा मिळकतीचे चतुःसिमापूर्वक मालक असल्याची बाब सिद्ध करू शकले नाहीत. सबब, एकंदरीत कागदोपत्री पुराव्यांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, गट क्र.२७१ ही मिळकत वादी व प्रतिवादी

यांच्या मध्ये आणेवारीप्रमाणे सामाईक कब्जेवहीवाटीची असल्याचे दिसुन येते. वादीने दावा मिळकतीस नमुद केलेल्या चतुःसिमापूर्वक क्षेत्र वादीस कशाच्या आधारे मिळाले याबाबत स्पष्टपणे नमुद केलेले नाही. वादी व प्रतिवादींचे सदर मिळकतीमध्ये आणेवारीप्रमाणे वहीवाट असलीतरी त्यांच्यामध्ये गटाचे वाटप झाल्याचे दिसून येत नाही. तसेच सदर गट नंबर मध्ये त्यांचे क्षेत्र निश्चीत कुठे आहे हे निर्विवादपणे अभिलेखावर नाही. ज्ञानेश्वर वाघमारे (प्र.सा.क्र.१) यांच्या उलटतपासामध्ये त्यांनी दि.२८/११/१९७७ रोजी ९१आर जमिन खरेदी केली होती. परंतू दिशा निश्चीत केल्या नव्हत्या असे सुचविण्यात आले. यावरुनही दिशा निश्चीतीबाबत साशंकता निर्माण होते. सबब, क्षेत्र निश्चीती नसल्यामुळे वादीच्या दावा मिळकतीवर प्रतिवादींनी अतिक्रमण केले ही बाब संयुक्तिक वाटत नाही.

२८. वादीने नि.क्र.७७ वर प्रतिवादी क्र.१ याने प्रतिवादी क्र.२ यांना करुन दिलेले बोअरवेलमधील हक्काचे खरेदीखत दाखल केले आहे. त्याचे अवलोकन केले असता सदरचे बोअरवेल गट क्र.२७१ मध्ये प्रतिवादी क्र.१ च्या क्षेत्रात आहे असे दिसुन येत नाही. तसेच वादींनी त्यांच्या पुराव्यामध्ये सदरचे बोअरवेल सद्यस्थितीमध्ये अस्तित्वात नसल्याचे मान्य केले आहे अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी क्र.१ वादींना बोअरवेलचे पाणी घेण्यास हरकत अडथळा करत असतील ही बाब संयुक्तिक वाटत नाही.

२९. एकंदरीत परिस्थितीचे अवलोकन केले असता वादी त्यांची व प्रतिवादी क्र.२ यांची दावा मिळकत एकत्र कुटूंबाची खरेदीची मिळकत आहे हे सिध्द करु शकलेले नाही. वादी व प्रतिवादी यांचे क्षेत्र निश्चीत नसल्यामुळे प्रतिवादींनी वादीच्या मिळकतीवर अतिक्रमण केल्याचे दिसुन येत नाही. बोअरवेल अस्तित्वात नसल्याचे वादी क्र.१ याने मान्य केली असल्याने त्याबाबत अनुतोष मिळण्यास वादी पात्र नाही. सबब, दावा मिळकतीचे वाटप होत नाही, क्षेत्र निश्चीती होत नाही तोपर्यंत अतिक्रमणाची बाब अभिलेखावर येवू शकत नाही. सबब, वादी मागणी करत असणा-या अनुतोषास ते पात्र नाहीत. यास्तव मुद्दा क्र.१ ते ६ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.७ करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वादीचा दावा नामंजूर करण्यात येत आहे.

२. दाव्याचा खर्च वादी व प्रतिवादींनी आपापला सोसावा.

३. येणेप्रमाणे हुकूमनामा करणेत यावा.

खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2026.03.24 15:10:59 +0530

सांगोला
दि.१६/०३/२०२६

**( श्रीमती पी. आर. कुलकर्णी )**
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, सांगोला

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Civil Judge, J.D. & J.M.F.C. Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 24/03/2026 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 24/03/2026 |